## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

# पुणे मेट्रो तर्फे दुसऱ्या इंडियन मेट्रो रेल ऑर्गनायझेशन्स सोसायटी (आय-मेट्रो) मनुष्यबळ परिषदेचे आयोजन




पुणे: महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो), पुणे, यांनी ३ आणि ४ जुलै २०२५ रोजी क्राऊन प्लाझा, बंड गार्डन रोड, येथे दुसऱ्या आय-मेट्रो मनुष्यबळ (HR) परिषदेचे यशस्वीरित्या आयोजन केले. या दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषदेमध्ये भारतातील प्रमुख मेट्रो रेल प्रकल्पांमधील मनुष्यबळ अधिकारी एकत्र आले होते. मानवसंसाधन क्षेत्रापुढील आव्हाने आणि उपायांवर अर्थपूर्ण चर्चा करणे हा या परिषदेचा उद्देश होता.

या दोन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते झाले. मान्यवरांची

नोंदणी आणि स्वागतपर सत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुणे मेट्रोचे महाव्यवस्थापक (मनुष्यबळ) कॅप्टन डॉ. राजेंद्र सनेर-पाटील यांनी स्वागतपर भाषण देऊन परिषदेचे महत्व आणि गाभा स्पष्ट केला. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) चे महाव्यवस्थापक (मनुष्यबळ प्रकल्प) श्री. रजनीश पांडे यांनी परिषदेतील सदस्य म्हणून प्रास्ताविक भाषण दिले. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांच्या भाषणाने परिषदेचे औपचारिक उद्घाटन झाले. त्यांनी मेट्रो क्षेत्रासाठी मजबूत मनुष्यबळ  तयार करण्यासाठी अशा सहयोगी मंचांच्या उपयुक्ततेची दखल घेतली आणि मनुष्यबळ विभागांमध्ये एकात्मिक नेटवर्क आणि ज्ञानाची देवाणघेवाण मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे हे अधोरेखित केले.

या बैठकीचा मुख्य भाग विविध मेट्रो संस्थांनी सादर केलेल्या विषयानुसार सादरीकरणांचा होता, ज्यात भरतीचे प्रकार, पदोन्नती धोरणे, कार्य व्यवस्थापन प्रणाली, भत्ते व सवलती, आणि प्रशिक्षण व विकास धोरणे यांसारख्या महत्त्वाच्या मनुष्यबळ क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे हे होते. विविध मेट्रोमध्ये स्वीकारल्या गेलेल्या मनुष्यबळ कार्यान्वयनासंबंधी सर्वोत्तम पद्धतींची विस्तृत आणि सखोल माहिती मिळावी यासाठी ही सत्रे काळजीपूर्वक तयार करण्यात आली होती. पुणे मेट्रो, दिल्ली मेट्रो, जयपूर मेट्रो, बंगळूरु मेट्रो, कोची मेट्रो, नोएडा मेट्रो, चेन्नई मेट्रो, मुंबई मेट्रो, गुजरात मेट्रो, उत्तर प्रदेश मेट्रो, कोलकाता मेट्रो आणि मध्य प्रदेश मेट्रो या मेट्रोच्या अधिकारी वर्गासह संचालक, महाव्यवस्थापक आणि उपमहाव्यवस्थापक यांसारख्या वरिष्ठ पदांवर काम करणाऱ्या इतरही अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या चर्चा सत्रामध्ये भाग घेतला. हे सर्व वरिष्ठ अधिकारी त्यांच्या संबंधित संस्थांमध्ये मनुष्यबळ धोरण आणि अंमलबजावणीमध्ये सक्रियपणे सहभागी होते.

विविध संस्थांमधील माहितीची देवाण घेवाण करण्याव्यतिरिक्त, ही बैठक एकत्रित मनुष्यबळ मानकांवर विचारमंथन करण्यासाठी, आंतर-मेट्रो सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आणि या क्षेत्रातील भविष्यातील मनुष्यबळ विकासाला आकार देणाऱ्या मुद्द्यांना ओळखण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून उपयुक्त ठरली. पुणे मेट्रोची पायाभूत सुविधा आणि कार्यक्षम कार्यप्रणाली य अधिकारी वर्गाला दाखविण्यासाठी पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय इंटरचेंज मेट्रो स्थानक आणि स्वारगेट मेट्रो स्थानकांना भेट देखील आयोजित करण्यात आली होती, ज्यामुळे सर्व उपस्थितांसाठी माहिती मिळवण्याचा अनुभव अधिक समृद्ध झाला.

या परिषदेमध्ये खुली चर्चा आणि कृतीशील मुद्द्यांना अंतिम रूप देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यामुळे आय-मेट्रोच्या मनुष्यबळ कार्यगटाने देशातील मेट्रो प्रणालींमध्ये लोक-केंद्रित, उच्च-कार्यक्षम कार्यसंस्कृती निर्माण करण्याच्या वचनबद्धतेची पुन्हा पुष्टी केली. अशा केंद्रित उपक्रमांद्वारे, पुणे मेट्रो भारतातील मेट्रो इकोसिस्टममध्ये व्यावसायिक विकास आणि संस्थात्मक समन्वय साधण्यात अग्रगण्य भूमिका बजावत आहे.



